RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक ४] सोमवार, जानेवारी ३१, २०२२/माघ ११, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. ... ... ... | पृष्ठे १—२ |


दिनांक २९ जानेवारी २०२२ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९६२ चा महा. ५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, " जास्तीत जास्त पंचाहत्तर आणि कमीत कमी पन्नास इतके " या मजकुराऐवजी, " पंचाऐंशी पेक्षा अधिक नसतील आणि पंचावन्न पेक्षा कमी नसतील इतके " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६२ चा महा. ५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.